100730FT0225

# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

☎ : 24010437/4701/24020781
24037124/5273/24044489
Fax : 24024068
Visit us on :
http://mpcb.gov.in

Kalpataru Point, 3rd & 4th Floor,
Sion Matunga Scheme Rd.No.8
Opp. Cine Planet cinema,
Near Sion Circle, Sion (E),
Mumbai – 400 022.

By R.P.A.D./Fax/Hand Delivery

No.BO/P&L Divn./B-4773

Date: 28/7/2010

To

The Regional Officer,
Maharashtra Pollution Control Board,
Mumbai/Thane /Navi Mumbai/Raigad/Kalyan/Pune/Nashik
Aurangabad/Nagpur/Amravati/Kolhapur /chandrapur.

## CIRCULAR

Sub : First Appellate Authority Order dtd.6/7/2010 under the Right to Information Act, 2005 in respect of noise pollution Due to firecrackers.

Ref :

1) Application of Shri Ajay Marathe under the Right to Information Act, 2005 dtd.01/04/2010.
2) Personal hearing dtd.3/7/2010 extended to the Appellant.

---

Shri Ajay Marathe had made application under the provisions of Right to Information Act 2005 to the Public Information Officer( Technical ) to make available certain information about the Noise Pollution being caused during Diwali Festival of 2009 and regarding the actions initiated by the Maharashtra Pollution Control Board in respect of the said Noise Pollution, stating that the regulation and control of Noise Pollution is the responsibility of the Maharashtra Pollution Control Board as per the Judgment and Order passed by the Hon'ble Supreme Court of India in the Writ Petition No 92 of 1998, but the Maharashtra Pollution Control Board has not shown to the appellant how the responsibility of Noise Pollution (Control and Regulation) does not vest with the Board. The Appellant (Original Applicant) also filed appeal on the ground that what further action, the Maharashtra Pollution Control Board has initiated in respect of the exceeding report of noise monitoring done during the Diwali Festival period. Since, the Appellant was not satisfied with the information given by the Board, he had preferred 2nd Appeal before the Hon'ble Chief Public Information Commissioner, Maharashtra Information Commission.

The Appeal was fixed for hearing before the State Information Commission on 3/07/2010, when the Appellant was absent. The State Information Commission specifically observed that even though, heavy rains are there, taking into consideration huge quantity of Appeals being preferred before the Hon'ble Commission, the Commission has decided that unless emergent situations are there, the Appeal will not be postponed and therefore, the hearing of the Appeal was conducted in the presence of the Public Information Officer and First Appellate Authority of the Maharashtra Pollution Control Board,

The Public Information Officer, Maharashtra Pollution Control Board specifically communicated vide letter dtd.27/11/2009 that the Report on Noise Monitoring done during the Diwali Festival has been placed on the website of the Maharashtra Pollution Control Board, the address was also provided in the said letter. It was further made clear that the Maharashtra Pollution Control Board had supplied the noise meters to the Police Department temporarily for doing noise monitoring in the Diwali Festival and other occasions. However, the Police Department had not made available the copies of the said Monitoring Reports to the Maharshtra Pollution Control Board.

The Board also pointed out that the State Government appointed various Authorities for effective implementation of the Noise Pollution (Regulation and Control) Rules, 2000 and appointed various officers of such Authorities for the purpose of monitoring of noise pollution levels of the activities coming under their jurisdiction. It was also made clear that the responsibility of the Board is to do monitoring of noise levels on the basis of complaints made / referred to it and the concerned Authorities are under obligation to initiate further necessary actions in respect of the noise pollution being caused within their jurisdiction. It is also stated that the responsibility of the Board is limited to the regulation and control of industrial noise only. The Board has also informed the State Information Commission that the noise monitoring done for the year, 2007-2008 and 2009 showing the decreased levels of noise during the Diwali Festival period. The Board has made clear in its reply that the Municipal Corporation and the Police Authority are the appropriate Authorities to initiate necessary action under the Noise Pollution (Regulation and Control) Rules, 2000.

The State Information Commission therefore, has come to the conclusion that whatever documents are available with the Board are being made available to the Appellant, but, it appears that the Appellant wanted a pointed reply. The State Pollution Control Board has rightly not initiated further action in view of the

specific jurisdiction given in the G.R. dtd.21/4/2009 and 7/8/2009 issued by the Environment Deptt., Govt. of Maharashtra.

(D. T. Devale)
Sr.Law Officer

Copy to :- W.P.A.E. / A.P.A.E. / P.S.O. / (R.O. P&P)/I/c Zonal Officer (PAMS) (R.O. PCI-II)/ R.O. (HQ) / Sr. Administrative Officer, MPCB, Mumbai – for information

Copy to : Asstt.System Officer, MPCB, Mumbai – for information and necessary action -- He is instructed to hoist the said circular on the website alongwith the circulars issued by the Legal Wing dtd.13/1/1989, 16/11/1990 and paper circulated to all the Regional Officers in respect of collection of Law Evidence Sample procedure. The soft copies of the same are incorporated in the common folder of EIC Division.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७७१५/अपील क्र.५८८४/०२

श्री. अजय मराठे ------- अपीलकर्ता

५०४, न्यू सर्वोदय सोसायटी,

सेक्टर ४, प्लॉट २९ ब, वाशी, नवी मुंबई.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ------- उत्तरवादी

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,

कल्पतरु पॉईंट, २/३/ ४ था माळा, सिने प्लेनेटसमोर,

सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व) मुंबई २२.

M. P. C. BOARD
Inw. 10 6 7 16 | 1 . 1 ...
Sion, Mumbai-22.

२. जन माहिती अधिकारी

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,

कल्पतरु पॉईंट, २/३/ ४ था माळा, सिने प्लेनेटसमोर,

सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व) मुंबई २२.

**- विवेचन -**

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ०१/०४/ २०१०

सुनावणीचा दिनांक ०३/०७/२०१०

अपीलार्थी अनुपस्थित त्यांनी फोन करुन सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली होती. पण अतिवृष्टी असली तरीही येथे येणे शक्य असल्यामुळे व आयोगाकडील येणारी फार मोठया प्रमाणावरील अपीलांची संख्या लक्षात घेता आयोगाने आत्यंतिक परिस्थितीशिवाय सुनावणी पुढे न ढकलण्याचे धोरण स्वीकारलेले आहे त्यानुसार सुनावणी घेण्यांत आली. अपीलार्थीचा अपीलमेमो विचारात घेण्यात आला. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीना जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती व अपिलीय अधिकाऱ्यांकडील सुनावणीच्या वेळेला दिलेल्या अतिरिक्त माहितीने सुध्दा अपीलार्थीचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केलेले आहे. या द्वितीय अपीलातील मुद्दे व प्रदुषण मंडळाने दिलेले उत्तर पुढीलप्रमाणे आहे -

Dewale
pl. see

Y2001
Copy is with
appeal
officers

TKH IT
— Put on website
& also issue the
Circular in the
reference of order

20.7.10

"मुद्दा क्र. १ अपीलकर्त्याने द्वितीय अपीलामध्ये नमूद केले आहे की, दिवाळी, २००९ मध्ये प्रचंड ध्वनीप्रदूषण झाले होते व त्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे इतर माहिती बरोबर मप्रनिमंडळाने काय कार्यवाही केली असे विचारले होते व ही माहिती मंडळाकडे उपलब्ध नाही असे मंडळाने त्यांना कळविले असल्याबद्दल म्हटले आहे.

उत्तर -- याबाबत, माहिती अधिकारी, मुख्यालयं यांनी अर्जदारास दिनाक २७/११/२००९ च्या पत्रान्वयें माहिती देताना असे कळविले होते की, दिवाळीच्या कालावधीत केलेल्या ध्वनी तीव्रतेच्या मोजमापनाबद्दलचा अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे व त्यांना मंडळाच्या संकेतस्थळाचा पत्तासुध्दा कळविण्यात आला होता. परंतु अर्जदाराने पोलीसांना तसेच नगरपालिकांना डेसिबल मोजणारी उपकरणे मप्रनिमंडळाकडून देण्यात आली होती. त्यांनी मोजलेले डेसिबल कळावे याबाबत विचारणा केलेली होती. त्या अनुषंगाने माहिती अधिकारी, मुख्यालय यांनी अर्जदारास वरील पत्रानुसार असे कळविले होते की, ध्वनी मोजणारी उपकरणे फक्त पोलीस खात्याला देण्यात आलेली आहेत. डेसिबलबाबतची माहिती मप्रनि मंडळाकडे उपलब्ध नाही व ती पोलीस विभागाकडून घेण्यात यावी. त्यामुळे अपीलकर्त्याने नमूद केलेला वरील मुद्दा चुकीचा आहे.

मुद्दा क्र. २ व ३ सदरहू मुद्दयांमध्ये नमूद केले आहे की, मे. सर्वोच्च न्यायालयाच्या (SC judgment WP ९२ of १९९८ ) निर्णयाप्रमाणे ध्वनी प्रदूषण नियंत्रणाबाबतची जबाबदारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची आहे व मप्रनि मंडळाने दिलेल्या माहितीनुसार ध्वनी प्रदूषण नियंत्रणाची जबाबदारी मंडळाची नाही असे कुठेही दाखवून दिलेले नाही, असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे.

उत्तर -- याबाबत, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) २००० ची प्रभावीपणे अंमलबजांवणी करण्यासाठी प्राधिकरणाची नियुक्ती करण्याबाबतचा शासन निर्णय क्र.ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.९५/ताक-१, दिनांक २१/४/२००९ निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयानुसार, ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता शासनाच्या अधिपत्याखाली असलेल्या संस्थांमधील संबंधित अधिकाऱ्यांची पदनाम

प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे विनंतीनुसार ध्वनी प्रदूषणाची पातळी मोजण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

त्यामुळे मप्रनि मंडळाची जबाबदारी ही फक्त विनंतीनुसार ध्वनी प्रदूषणाची पातळी मोजण्यापुरती मर्यादित आहे व याबाबत कारवाई करण्याची जबाबदारी वरील शासन निर्णयानुसार संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेली आहे. तसेच औद्योगिक वसाहतीतील ध्वनी प्रदूषणाची नियंत्रण करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याची जबाबदारी मप्रनि मंडळाची आहे.

मुद्दा क्र. ४-- मुद्दा क्र. ४ मध्ये अपीलकर्त्यांने असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने जाहिर केलेल्या अहवालांप्रमाणे ध्वनी प्रदूषण मानके ही विहित मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे त्यावर कार्यवाही केली असल्यास तसे कळावे.

उत्तर -- मुद्दा क्र.२ व ३ च्या उत्तरामध्ये नमूद केल्याप्रमाणे तसेच मप्रनि मंडळाने २००७, २००८ आणि २००९ मध्ये मोजमाप केलेल्या ध्वनी प्रदूषणाची पातळी वर्षानुवर्षे कमी होत आलेली आहे.

वरील सर्व मुद्दयांचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, अपीलकर्त्यास मप्रनि मंडळाने सर्व माहिती विहित कालावधीत दिलेली होती. तथापि सदरहू माहिती पुनश्च सादर करण्यात येत आहे. तरी वरील मुद्दयाचा विचार करुन व अपीलकर्त्यांस दिलेली माहिती विचारात घेता सदरहू अपील फेटाळण्यात यावे अशी विनंती करण्यात येत आहे. "

त्यामुळे कागदोपत्री असलेली सर्व माहिती जरी देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकाऱ्यांनी केला असला तरी अपीलार्थीस ज्याठिकाणी नॉईज पोलूशन डेसिबेल्टस हे लिगली अलाऊड लेवल पेक्षा जास्त होते त्याठिकाणी कारवाई केली असल्यास तसे कळवावे व कारवाई केली नसेल तर तसे कळवावे अशी अपीलार्थींची पृच्छा आहे. यासंदर्भात प्रदुषण मंडळाने प्रोसिक्युशन कारवाई केली नाही असे सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले आहे. मात्र अशा प्रकारची कारवाई करण्यास तशी सक्षम यंत्रणा ही महापालिका व पोलीस ॲथॉरिटी यांच्याकडे आहे असे त्यांच्या उत्तरात स्पष्ट केलेले आहे व ही बाब मुद्दा क्र. २ व ३ च्या उत्तरात स्पष्ट केलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये जशी कागदपत्रे असतील तशी कागदपत्रे देण्यात

येतात. अपीलार्थीस पॉईंटेड उत्तर हवे आहे असे दिसते व ते उत्तर प्रदुषण मंडळाने वरील दिलेल्या कारणानुसार स्वत:हून कारवाई केलेली नाही हे आहे.

-----आदेश---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ०६.०७.२०१०